पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/१२/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०९/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. गिता सुशिल मंचरकर - सभापती**
२. मा. गोफणे अनुराधा देविदास
३. मा. जवळकर वैशाली राहूल
४. मा. नेटके सुमन राजेंद्र
५. मा. शितोळे शैलजा बाबुराव
६. मा. लांडे श्रध्दा बाजीराव

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.गावडे – सह आयुक्त, मा.उबाळे – प्रशासन अधिकारी ( शिक्षण मंडळ ), मा.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.पाटील – प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.श्रध्दा लांडे

श्री.कान्हूराज बगाटे, नाशिकचे अप्पर जिल्हाधिकारी यांचा मुलगा दिग्विजय कान्हूराज बगाटे हा रविवारी अपघाती निधन पावला आहे त्यास बैठकीत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**( दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून सर्वांनी श्रध्दांजली अर्पण केली )**

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) महिला बचत गटांना प्रोत्साहनपर अनुदान योजना सुरु करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.श्रध्दा लांडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १६/११/२०१५ व २६/११/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ५ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ९ विषय क्रमांक : १

दिनांक : ०९/१२/२०१५ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक : मा.वैशाली जवळकर अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०३/कावि/२७१/२०१५, दि.३०/११/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४५७ दिनांक २०/०१/२०१४ अन्वये मंजूर धोरणनुसार घटक योजना क्र.१७ विधवा व घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेत येते. या योजने करिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटना नुसार अर्ज मागविणेत आले असता एकूण ११०० अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटीशर्ती नुसार तपासणी केली असता एकूण ४५९ अर्ज पात्र ठरले आहेत. १५० अर्ज दुबार आहेत, ४९१ अर्ज अपात्र आहेत. सदर पात्र लाभार्थीना प्रत्येकी रक्कम रुपये ६,०००/- या प्रमाणे एकूण अंदाजे ४५९ पात्र होणा-या लाभार्थीसाठी रक्कम रुपये २७,५४,०००/- ( अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चौप्पन्न हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात “ विधवा व घटस्फोटीत महिलांना अर्थ सहाय्य ” या उपलेखाशिर्षावर रक्कम रुपये २,००,००,०००/- ( अक्षरी र.रु.दोन कोटी फक्त ) इतकी तरतूद शिल्लक आहे त्यामधून सदरचा खर्च करणेत येईल. पात्र ठरणा-या लाभार्थीना आर्थिक मदत देणेकामी येणा-या खर्चास र.रु.२७,५४,०००/- ( अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चौप्पन्न हजार फक्त ) तसेच ही योजना १२ ही महिने खुली असल्याने सन २०१५-१६ अखेर पर्यंत जेवढे अर्ज प्राप्त होतील त्यातील पात्र लाभार्थीना अनुदान मंजूर करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : १० विषय क्रमांक : २
दिनांक : ०९/१२/२०१५
सुचक : मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.श्रध्दा लांडे
संदर्भ : मा.अनुराधा गोफणे, मा.श्रध्दा लांडे यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्याच्यादृष्टीने ज्या महिला बचत गटांना बचतगट सुरु करुन ५ वर्षे पूर्ण झाली आहेत व त्यांची बचत नियमीत आहे अशा बचतगटांना प्रोत्साहनपर र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) अनुदान देण्याबाबतची योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( गिता सुशिल मंचरकर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८१६ /२०१५
दिनांक : ०९/१२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.